# प्रकरण 4 थे
# लोकसंख्या रचना (Population Composition)

४.१ वय रचना

४.2 लिंग रचना

४.3 साक्षरता

४.४ ग्रामीण व शहरी लोकसंख्या

## लोकसंख्या रचना (Population Composition)

लोकसंख्येची रचना म्हणजे त्यांचे वय, लिंग, वैवाहिक स्थिती, शिक्षण, व्यवसाय आणि घरच्या प्रमुखाशी संबंध यासारख्या घटकांच्या दृष्टीने लोकांच्या समूहाच्या वैशिष्ट्यांचे वर्णन. यापैकी, कोणत्याही लोकसंख्येचे वय आणि लिंग रचना सर्वाधिक प्रमाणात वापरली जाते. प्रत्येक वयोगटातील पुरुष आणि महिलांची संख्या आणि प्रमाण लोकसंख्येच्या वर्तमान आणि भविष्यातील सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीवर लक्षणीय प्रभाव टाकते.

## **४.१ वय रचना (**Age Composition)

लोकसंख्येच्या वयाची रचना ही मूलभूत लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्यांपैकी एक आहे आणि लोकसंख्याशास्त्रीय विश्लेषण आणि सामाजिक-आर्थिक विकास नियोजनासाठी उपयुक्त आहे. साधारणपणे, कमी विकसित देशांमध्ये तरुण लोकसंख्या आहे, तर अधिक विकसित देशांमध्ये वृद्ध लोकसंख्या आहे (लोकसंख्या संदर्भ ब्यूरो, 2011). विविध वयोगटांच्या सापेक्ष संख्येचा सामाजिक आणि आर्थिक धोरणांवर आणि लोकांचे जीवन जगण्याच्या मार्गावर महत्त्वपूर्ण प्रभाव पडतो.

**वयोरचना म्हणजे वयोगटांनुसार असणाऱ्या लोकांची संख्या**. जसे, अर्भक, बालक, कुमार, युवक, प्रौढ, वृद्ध. लोकसंख्येमध्ये प्रत्येक वयोगटाचा हिस्सा असतो. हा स् देशांनुसार बदलत असतो. याचे कारण म्हणजे प्रत्येक वयोगटातील लोकसंख्या वेगळी असते. लोकसंख्येत १५ ते ५९ या वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण जास्त असल्यास ते कार्यशील लोकसंख्या जास्त असण्याचे निदर्शक असते. याउलट ० ते १५ वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण जास्त असल्यास ते अवलंबित्वाचे प्रमाण जास्त असते. तसेच ६० पेक्षा जास्त वयोगटातील लोकांचे प्रमाण जास्त असल्यास देशाचा वैद्यकीय व आरोग्य सुविधेवर होणारा खर्च वाढणार, हे निदर्शनास येते.

वय अवलंबित्व गुणोत्तर (Dependancy Ratio) हे आर्थिकदृष्ट्या उत्पादक वयोगटांच्या तुलनेत अवलंबून असलेल्या वयोगटातील लोकांच्या संख्येचे गुणोत्तर आहे. अवलंबित वयोगट म्हणजे तरुण (१५ वर्षाखालील) आणि वृद्ध (६५ वर्षांपेक्षा जास्त).15 ते 64 वयोगटातील लोकांना आर्थिकदृष्ट्या उत्पादक म्हणून वर्गीकृत केले जाते. वय अवलंबित्व गुणोत्तर बहुतेक वेळा देशांच्या आर्थिक भाराचे सूचक म्हणून वापरले जाते. उच्च वय अवलंबित्व गुणोत्तर असलेल्या देशांमध्ये वृद्ध आणि तरुण लोक मोठ्या संख्येने आहेत जे मध्यम वयोगटातील लोकांच्या आर्थिक उत्पादकतेवर अवलंबून आहेत. लोकसंख्येतील मुलांचे मोठे प्रमाण म्हणजे ज्या देशांमध्ये जन्मदर खूप जास्त आहे त्या देशांमध्ये वय अवलंबित्वाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**लोकसंख्येतील स्त्री-पुरुषांची वेगवेगळ्या वयोगटात विभागणी म्हणजे लोकसंख्येची वयोरचना किंवा वय संरचना (Age Composition or Structure) होय**. "

**वयोरचनेचे मोजमाप**:

वयोरचनेचे मोजमाप अनेक पद्धतीने केले जाते. काही पद्धती पुढीलप्रमाणे आहेत.

**१) टक्केवारी पद्धती** (Percentage Method)

वयोरचनेचे मोजमाप करण्यासाठी सर्वत्र वापरली जाणारी ही पद्धत आहे. या प्रकारात निरनिराळ्या वयोगटातील लोकसंख्येची टक्केवारी काढली जाते. एकदा वयोगटाची टक्केवारी काढली की निरनिराळ्या लोकसंख्येच्या वयोरचने तुलना करणे सुलभ जाते. याद्वारे वयोरचनेत होणारे कालिक बदलही समजून घेता येतात.'वयोरचनेच्या टक्केवारीने वयं सूच्य प्रस्तंभ (मनोरे) (Age Pyramid) काढता येतात.या सूच्य प्रस्तंभद्वारे (मनोरे) वयोरचनेचा अभ्यास करता येतो. यात वयोगट खालून वर उतरल्या क्रमाने) दाखवितात. त्यामुळे वयोगटाची स्पष्ट कल्पना येते. हे सूच्य प्रस्तभ (मनोर) स्त्री-पुरुषासाठी तसेच ग्रामीण व नागरी लोकसंख्येसाठी काढता येतात.

**२) केंद्रीय प्रवृत्तीदर्शक परिमाणे** (Central Tendency Measurement) :

टक्केवारी शिवाय मध्य (mean), मध्यगा (median) व बहुलक (mode) या केंद्रीय प्रवृत्ती दर्शक परिमाणानेही वयोरचनेचे मोजमाप करता येते. पैकी लोकसंख्या वयाची मध्यगा (median age Population) ही पद्धत विशेष करून वापरली जाते. या पद्धतीत लोकसख्येची वयोगटानुसार दोन भागांत विभागणी केली जाते. वयाच्या गटाने लोकसंख्येची आकडेवारी उपलब्ध असते त्यामुळे वयाचा मध्यगा काढणे सोपे जाते त्यानुसार लोकसंख्येची विभागणी करून लोकसंख्येच्या वयोरचनेचा अभ्यास करता येतो.

**3.अवलंबनभार (Dependency ratio)**

लोकसंख्येच्या वयोरचनेवरून अवलंबन भाराची (अवलंबित्व प्रमाण Dependency ratio) कल्पना येते अवलंबन भाराचा लोकसंख्येच्या वयोरचनेचा अभ्यास करण्यास उपयोग होतो. लोकसंख्येच्या अवलंबित्व प्रमाणावरून लोकसंख्येत दर १०० व्यक्तीमागे अवलंबून असलेल्यांची संख्या समजते येथे १५ वर्षाखालील लहान मुले व ६० वर्षावरील वृद्ध हे लोकसंख्येतील कामकरी वर्गावर अवलंबून

असलेले समजले जातात. १५- ५९ किंवा ६४ वर्षे वयोगटातील व्यक्तीचा कामकरी वर्गात (Working Class) समावेश होतो. म्हणून "लोकसख्येतील मुले व वृद्ध आणि कामकरी लोकसंख्या याचे गुणोत्तर म्हणजे अवलंबित्व प्रमाण (Dependency ratio) होय. " ज्या प्रदेशात किंवा देशात जनन प्रमाण जास्त व मर्त्यता प्रमाण कमी असते तेथील लोकसंख्येत लहान मुले व वृद्धांचे प्रमाण जास्त असते. तेथील अवलंबन भार जास्त असतो आणि जेथे जनन व मर्त्यता प्रमाण कमी तेथील अवलंबन भार कमी असतो.

**4.वय दर्शक (Age Indices):**

वयोरचनेचे मापन करण्याची ही चौथी पद्धत आहे. वयरचनेचा अभ्यास वयदर्शकनेही (Age Indices) केला जातो. मनुष्यबळाचे नियोजन, लोकसंख्या वाडीचे व स्थलांतराचे पृथक्करण इत्यादीसाठी वय दर्शकाचा उपयोग होतो.

**वयोरचनेवर परिणाम करणारे घटक :**

वयोरचनेवर ज्या घटकांचा परिणाम होतो त्यात जनन, मर्त्यता, स्थलांतर व युद्ध हे चार पटक प्रमुख आहेत.

**१) जनन (Fertility):** जनन प्रमाणाचा वयोरचनेवर फार मोठा प्रभाव पडतो. जेथे जनन प्रमाण जास्त असते तेथील लोकसंख्येत बालके, लहान मुले व युवकांचे प्रमाण जास्त आणि जास्त वयातील व्यक्तीचे प्रमाण कमी असते. जेथे जनन प्रमाण कमी असते तेथे कमी वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण कमी आणि जास्त वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण जास्त असते. या दोन्ही प्रकाराच्या वयोगटांचा अभ्यास केल्यास तेथील वयोरचना कशी असेल याची कल्पना येते. इ.स. १९००-१९४५ या काळात संयुक्त संस्थानातील जनन प्रमाण कमी झाल्याने तेथील बालके व लहान मुलांचे प्रमाण कमी होऊन जास्त वयाच्या गटातील लोकसंख्येचे प्रमाण वाढले होते. अलीकडे विकसनशील देशातील जनन प्रमाण बदलल्याने तेथील वयोरचनेत बदल झाले आहेत.

**२) मर्त्यता (Mortality) :** मर्त्यता प्रमाणाचाही वयोरचनेवर फार मोठा परिणाम होतो. मर्त्यतेचा परिणाम ज्या गटात मर्त्यता जास्त असते त्या वयोगटावर होतो. मर्त्यतेमुळे त्या वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण कमी होते. उदा. बालकांचे मर्त्यता प्रमाण जास्त असेल तर तेथील लोकसंख्येत बालकांचे प्रमाण कमी होते. याउलट जास्त वय असलेल्या गटात मर्त्यता अधिक असेल तर तेथील लोकसंख्येत वृद्धांचे प्रमाण कमी होते. स्त्रीमर्त्यता प्रमाण अधिक असल्यास लोकसंख्येतील स्त्रियांचे प्रमाण कमी होते. अलीकडे विकसनशील देशातील मर्त्यततेचे प्रमाण कमी झाले आहे. पण त्याचबरोबर जनन प्रमाणात फारसा बदल झालेला नाही. तेथील जनन प्रमाण कमी झाले नाही. म्हणून विकसनशील देशातील वयोरचनेत बदल झाले नाहीत. १९३०-६० या काळात संयुक्त संस्थानात कमी वयोगटातील मर्त्यता प्रमाण घटल्याने या काळात लहान मुलांचे प्रमाण ५% ने वाढले होते. तसेच युरोपात जनन प्रमाण कमी झाल्याने तेथील लोकसंख्येत लहान मुलांचे प्रमाण कमी झाले आहे.

**३) स्थलांतर (Migration) :** स्थलांतराचा लोकसंख्येच्या वयोरचनेवर फार मोठा प्रभाव पडतो. लोकसंख्येचे जेव्हा स्थलांतर होते तेव्हा त्याचा दोन्ही भागाच्या (जेथून स्थलांतर होते व ज्या भागाकडे स्थलांतर होते) लोकसंख्येच्या वयोरचनेवर परिणाम होतो. स्थलांतरात मुख्यतः तरुण पुरुषांचे प्रमाण अधिक होते. त्यामुळे जेथून स्थलांतर होते तेथील लोकसंख्येत तरुण पुरुषांचे (१६ वर्षावरील) प्रमाण कमी होते आणि स्त्रिया मागे राहतात. अशावेळी तेथील लोकसंख्येत लहान मुलांचे (१५ वर्षाखालील) व वृद्धांचे (६० वर्षावरील) प्रमाण वाढते. उदा. कोकणातून मुंबई, ठाणे या शहराकडे त्याचप्रमाणे आखाती देशाकडे तरुणांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाल्याने या शहरात व आखाती देशातील लोकसंख्येत तरुणांचे (पुरुष) प्रमाण जास्त आढळते. तर कोकणातील लोकसंख्येत तरुणांचे प्रमाण कमी आणि लहान मुले, स्त्रिया व वृद्धांचे प्रमाण जास्त आढळते..

**४) युद्ध (Wars) :** युद्धाचा देखील लोकसंख्येच्या रचनेवर परिणाम होतो. जेव्हा दोन देशात मोठे युद्ध होते तेव्हा दोन्ही देशातील सैन्य कमी अधिक प्रमाणात मारले जातात. सैन्यात मुख्यतः तरुण जास्त असतात. सैन्य मारले गेल्याने त्या देशाच्या लोकसंख्येच्या त्या गटातील व्यक्तींचे प्रमाण कमी होते. त्याचा वयोरचनेवर परिणाम होतो. १९६२ च्या चीन, भारत युद्धात आणि १९६५ च्या भारत, पाकिस्तान युद्धात तसेच अलीकडील (मे २००३) अमेरिका-इराक युद्धात विशेषतः इराकमधील सैन्य मोठ्या प्रमाणात मारले गेल्याने चीन, भारत व इराक या वयोरचना एकदम बदलली.

दुसरे म्हणजे युद्धकाळात लष्करातील लोक आपल्या कुटुंबापासून दूर असतात. या काळात जननदर कमी होतो. युद्ध थांबल्यावर जेव्हा शांतता प्रस्थापित होते तेव्हा जवान आपल्या कुटुंबात परततात. तेव्हा जन्मदर वाढतो. याचा वयोरचनेवर परिणाम होतो. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अमेरिका व भारतातील सैन्य दुसऱ्या देशात होते. त्या काळात दोन्ही देशातील जन्मदर कमी झाले होते. युद्धानंतर जेव्हा सैन्य आपल्या देशात परतले तेव्हा दोन्ही देशातील जन्मदर वाढले होते. अशाप्रकारे युद्ध व शांततेच्या स्थितीचा वयोरचनेवर परिणाम होतो.

**४.2 लिंग रचना (Sex Composition)**

लिंगसंरचना ही लोकसंख्येतील स्त्री-पुरुषामधील तोल (Balance) दर्शविते. **"लोकसंख्येतील स्त्री-पुरुषांचे सापेक्ष प्रमाण (Proportion) याला लिंग सरचना (Sex (Composition) म्हणतात**. "स्त्री-पुरुषातील दोन लिंगाचे (Sexes- male -female) गुणोत्तर (ratio) म्हणजे लिंग संरचना होय."

१००० पुरुषामागे स्त्रियांची असलेली संख्या म्हणजे लिंग संरचना अशीही 'व्याख्या केली जाते. **थोडक्यात - "एखाद्या देशातील किंवा प्रदेशातील १००० पुरुषामागे असलेली स्त्रियांची संख्या म्हणजे लिंग संरचना अशीही लिंगसंरचनेची व्याख्या केली जाते**.'

**लिंगसंरचनेचे मापन (Measurement) :** लोकसंख्येतील स्त्री-पुरुषांचे प्रमाण १००० किंवा १०० पुरुषाबरोबर किती स्त्रिया या पद्धतीने काढले जाते आणि हे प्रमाण पुढील सूत्राने काढले जाते.

सूत्र :

लिंग गुणोत्तर = एखाद्या देशातील / प्रदेशातील स्त्रियांची एकूण संख्या ÷ एखाद्या देशातील / प्रदेशातील पुरुषांची एकूण संख्या x १०००

उदा. एका देशातील लोकसंख्येत स्त्रियांची संख्या ४० कोटी आणि पुरुषांची संख्या ५० कोटी आहे.

४०÷ ५० x १००० = ८०० स्त्रिया म्हणजे १००० पुरुषामागे ८०० स्त्रिया लिंग प्रमाण असे राहील.

**लिंग सरचनेचे अध्ययनातील महत्त्व**

१) लिंग संरचनेवर विवाह, जननप्रमाण, कामकरी वर्गाची संख्या इत्यादी गोष्टी अवलंबून असतात.

२) लिंग संरचनेवर मजुरांचा पुरवठा अवलंबून असतो. लोकसंख्येत पुरुषांचे प्रमाण जास्त असल्यास त्यावर मजुराचा पुरवठा अवलंबून असतो.

३) लोकसंख्येमध्ये पुरुषाचे प्रमाण जास्त असल्यास मुलींच्या विवाहाचे वय कमी होते. (अशा परिस्थितीत विवाहाच्या वेळी मुलाचे वय जास्त व मुलीचे वय कमी असते. यामुळे पती-पत्नीच्या वयात जास्त फरक पडतो. )

४) पती-पत्नीच्या (मुला-मुलीच्या) वयात जास्त फरक पडल्यास समाजात विधवा स्त्रियांची संख्या वाढण्याची शक्यता असते.

५) मुलींचे विवाह कमी वयात झाले तर जननप्रमाण वाढते. त्यामुळे लोकसंख्या वाढते.

६) लोकसंख्येत पुरुषांचे प्रमाण जास्त असल्यास पुरुष मर्त्यता जास्त आणि स्त्रियांचे प्रमाण कमी असल्यास स्त्री मर्त्यता कमी असते.

७) समाजात स्त्रियांचे प्रमाण जास्त असल्यास वेश्या व्यवसाय आणि पुरुषाचे प्रमाण जास्त असल्यास बलात्कारासारख्या सामाजिक समस्या निर्माण होतात. म्हणून लिंग सरचनेचा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो.

**'लिंग संरचनेवर परिणाम करणारे घटक:**

लिंगामध्ये (पुरुष स्त्री) एकास एक असे सम प्रमाण असायला हवे. पण ते असे असत नाही. त्यात तफावत आढळते.

**१) मूल जन्माच्यावेळी असलेले लिंग प्रमाण:** कुटुंबात जन्माला आलेले मूल हे पुरुष किंवा स्त्री जातीचे असते. सामान्यतः कोणत्याही कुटुंबात मुलीपेक्षा मुले जास्त जन्माला येतात. हे प्रमाण साधारणतः १०० मुलीमागे १०७ ते १३५ पुरुष एवढे असते. काही ठिकाणी ते १७० एवढे असते किंवा १००० मुलीमागे १०७० ते १३५० मुले असे असते. मात्र प्राथमिक अवस्थेत पुरुष व स्त्रियांची असलेली ही संख्या तशीच राहात नाही. कारण मूल जन्माला आल्यापासून ते पुरुष वर्ष पूर्ण होईपर्यंत जिवंत राहीलच असे नाही. कारण सुस्वातीच्या ४ वर्षात मुलांच्या (Male child) मृत्यूचे प्रमाण जास्त असते. याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत. मुलीपेक्षा मुले नाजूक असतात. त्यामुळे मुलीपेक्षा मुलामध्ये रोगप्रतिकारशक्ती कमी असते. यामुळे मुले रोगास बळी पडून मृत्यू पावतात. बऱ्याच वेळा कुपोषणानेही मुलांचा मृत्यू होतो.'' म्हणून सुरुवातीच्या काळात लोकसंख्येत मुलीपेक्षा मुलांचे प्रमाण जास्त असले तरी मुलातील मृत्यूमुळे दोहोंचे प्रमाण जवळजवळ समसमान होते. तरी लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण कमी आढळते. याची काही कारणे आहेत.

१) बऱ्याच कुटुंबात मुलगी झाली म्हणून तिचे व्यवस्थित संगोपन केले जात नाही. मुलींची हेळसांड होते. त्यामुळे लहान वयात मुली मृत्यू पावतात. कुपोषणानेही काहीवेळा मुली मरण पावतात.

२) तसेच विशेषतः अविकसित देशात १६-३५ वयोगटात स्त्रियांमध्ये प्रसूतीच्या बाबतीत मृत्यूचे प्रमाण जास्त असते. या सर्व कारणाने लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण कमी होते. परिणामतः अविकसित देशातील लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण कमी असते. याउलट विकसित (प्रगत देशातील लोकसंख्येत खियांचे प्रमाण भागास देशांच्या तुलनेत थोडे जास्त असते. कारण - विकसित देशात वैद्यकीय सोई, उत्तम आहार, उच्च जीवनमान यामुळे स्त्रियांतील मृत्यूचे प्रमाण कमी असते. एकूण सर्व वयोगटातील पुरुषात मृत्यूचे प्रमाण अधिक म्हणून लोकसंख्येत तुलनात्मक पेक्षा स्त्रिया थोडा जास्त असतात.

**२) स्त्री-पुरुष मर्त्यता प्रमाणातील तफावत:** सामान्यतः सर्व वयोगटात स्त्रियापेक्षा पुरुषांच्या मर्त्यतेचे प्रमाण अधिक असते. विकसित देशात पुरुषातील मृत्यूचे प्रमाण जास्त असते. त्यामानाने स्त्रियांच्या मृत्यूचे प्रमाण कमी असते. म्हणून विकसित देशांच्या लोकसंख्येत स्त्रियांच्या मानाने पुरुषांची संख्या कमी असते. याउलट अविकसित (मागासलेले) देशांच्या लोकसंख्येत स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या जास्त असते. याची काही कारणे आहेत. अविकसित देशात अपुऱ्या आरोग्य सेवा, कमी दर्जाचे राहणीमान, कमी प्रतीचा आहार, १-१५ वयोगटातील मुलीमधील कुपोषण आणि १६-३५ वयोगटातील स्त्रियांमध्ये प्रसूती काळातील मृत्यू यामुळे मागास देशातील लोकसंख्येत पुरुष जास्त व स्त्रिया कमी आढळतात.

**३) स्थलांतर :** स्थलांतर हा लिंग संरचनेवर परिणाम करणारा एक महत्त्वाचा घटक आहे. मानव उदरनिर्वाहाची साधने प्राप्त करण्यास एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात स्थलांतर करतो. या पुरुषांची संख्या अधिक असते. कारण नवीन ठिकाणी स्त्रियांना बरोबर घेऊन राहणे कठीण असते. म्हणून अधिकतर पुरुष स्थलांतर करतात. या स्थलांतराच्या दोन्ही (म्हणजे जेथून स्थलांतर होते त्याच्या आणि जिकडे स्थलांतर होते त्याच्या) लिंग संरचनेवर परिणाम होतो. जेथून स्थलांतर होते तेथून पुरुष अन्यत्र जात असल्याने तेथील (मूळ) लोकसंख्येत पुरुषाचे प्रमाण कमी होते आणि तेथील (मूळ) लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण वाढते तर जेथे (नवीन ठिकाण) स्थलांतर होते तेथील (नवीन स्थळ) लोकसंख्येत पुरुषांचे प्रमाण वाढते व

स्त्रियांचे प्रमाण कमी होते. उदा. कोकणातून मुंबईकडे लोकसंख्येचे स्थलांतर झाल्याने कोकणातील लोकसंख्येत पुरुषांचे प्रमाण कमी तर स्त्रियांचे प्रमाण जास्त आणि मुंबईतील लोकसंख्येत पुरुषांचे प्रमाण जास्त आणि स्त्रियांचे प्रमाण कमी आढळते. तसेच आखाती देशात स्थलांतरितामुळे तेथील लोकसंख्येत पुरुषांचे प्रमाण जास्त आढळते.

**४) युद्ध :** युद्धाचा लिंग रचनेवर परिणाम होतो, स्थलांतराप्रमाणे यात दोन्ही बाजूंच्या लिंग रचनेवर परिणाम होतो. मोठ्या व दीर्घकाळ चालणाऱ्या युद्धात सैन्य मारले जाते. ज्या बाजूचे सैन्य मारले जाते. त्या बाजूच्या लोकसंख्येतील पुरुषांचे प्रमाण कमी आणि स्त्रियांचे प्रमाण जास्त " होते.दुसऱ्या महायुद्धात जर्मनीतील बरेच सैन्य मारले गेल्याने तेथील लोकसंख्येत पुरुषांचे प्रमाण कमी व स्त्रियांचे प्रमाण वाढले होते. त्याचप्रमाणे अलीकडील अमेरिका, अफगाणिस्तान व इराक या देशांच्या दरम्यान झालेल्या युद्धात मोठ्या प्रमाणात पुरुष सैन्य मारले गेल्याने त्या देशाच्या लोकसंख्येत पुरुषांचे प्रमाण कमी आणि स्त्रियांचे प्रमाण वाढले आहे.

## ४.3 साक्षरता (Literacy):

लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण हे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे द्योतक असते. या प्रमाणाचा थेट संबंध लोकांचे राहणीमान, स्त्रियांचा समाजातील दर्जा, उपलब्ध शैक्षणिक सुविधा व शासनाच्या धोरणांशी असतो. साक्षरता हे आर्थिक विकासाचे कारण व परिणाम दोन्हीही आहे. देशानुसार साक्षरतेची व्याख्या बदलते. भारतामध्ये सात वर्षांवरील व्यक्ती साक्षरतेच्या गणनेसाठी विचारात घेतली जाते. ज्या व्यक्तीस लिहिता, वाचता आणि गणिती क्रिया समजून करता येतात ती साक्षर मानली जाते.

एखाद्याचे स्वतःच्या मातृभाषेत लिहिणे व वाचण्याचे सामर्थ्य (ability) म्हणजे साक्षरता होय. भारतात जो मनुष्य समजून साधा संदेश कोणत्याही भाषेत लिहू व वाचू शकतो त्यास साक्षर मनुष्य म्हणतात. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या लोकसंख्या आयोगाने ही व्याख्या सुचविली आहे.. निरनिराळ्या

देशांनी साक्षरतेच्या विविध व्याख्या स्वीकारल्या आहेत. मात्र सर्वांनी स्वीकारलेली विश्वव्यापी अशी कोणतीही व्याख्या नाही. आंतरराष्ट्रीय रूढीनुसार साक्षर म्हणजे माणसाची कोणत्याही भाषेतील किमान संदेश वाचनाची व लिहिण्याची क्षमता (ability) होय. दुसऱ्या शब्दात माणसाकडे वाचन व लिहिण्याचे असे दोन्ही कौशल्य असल्यास त्यास साक्षरता म्हणतात. अशाप्रकारे समाजातील प्रौढांना कोणत्याही भाषेत काही प्रमाणात समजून वाचता व लिहिता येत असल्यास त्यास साक्षर समाज (Literate society) म्हणतात.

**साक्षरतेवर परिणाम करणारे घटक :** साक्षरतेवर विविध घटकांचा परिणाम होतो. त्यात पुढील घटक महत्त्वाचे आहेत.

**१) आर्थिक घटक:** आर्थिक स्थिती व साक्षरता यामध्ये संबंध आहे. औद्योगिक व कृषिप्रधान देशाच्या साक्षरतेवरून हे स्पष्ट होते. उद्योगप्रधान देशात शिक्षणास जास्त मागणी असते. कृषिप्रधान देशात शिक्षणास फारशी मागणी नसते. त्यामुळे दोन्ही देशाच्या साक्षरतेत खूप फरक असतो. आर्थिक स्थितीचा विचार करता आर्थिक स्थिती उत्तम असणाऱ्या सभ्य समाजात गरीब आदिवासी समाजापेक्षा साक्षरता जास्त असते. पालकाचे उत्पन्न व त्याचे राहणीमान यावर साक्षरता अवलंबून असते. म्हणून श्रीमंत कुटुंबात साक्षरता जास्त व गरीब कुटूंबात कमी असते.

**२) दळणवळण व वाहतुकीच्या सोई:** जेथे दळणवळण व वाहतुकीच्या सोई असतात आणि लोकांची हालचालीची गती जास्त तेथे साक्षरता जास्त असते. जेव्हा ग्रामीण व शहरी भागात व्यवस्थित व योग्य वाहतूक नसते तेव्हा ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरात जाऊन शिकू शकत नाहीत. अविकसित देशात हे चित्र आढळते. म्हणून अविकसित देशात साक्षरतेचे प्रमाण कमी असते.

**३) नागरीकरण**: मोठ्या प्रमाणात नागरीकरण झालेल्या देशात साक्षरता जास्त असते. नागरी भागात शिक्षणास जास्त मागणी असते. ग्रामीण भागापेक्षा नागरी भागातील व्यवसायाची रचना (Occupation

Structure) पाहता तेथे शिक्षणाची गरज जास्त असते हेही महत्त्वाचे आहे. म्हणून शहरी भागात ग्रामीण भागाच्या तुलनेने साक्षरता जास्त असते.

**४) तांत्रिक ज्ञानाची प्रगती:** नागरी क्षेत्रात तांत्रिक ज्ञानाची प्रगती झालेली असते. येथे नवीन नवीन उद्योग स्थापन होतात. उद्योगात आधुनिक नवीन नवीन तंत्राचा वापर होतो त्यामुळे शहरी भागात शिक्षणाला अधिक महत्त्व असते. म्हणून शहरी भागात साक्षरता जास्त व ग्रामीण भागात तांत्रिक ज्ञानाची प्रगती न झाल्याने साक्षरतेचे प्रमाण कमी असते.

**५) स्त्रियांचा सामाजिक दर्जा :** साक्षरतेवर परिणाम करणारा हा महत्त्वाचा घटक आहे. प्रगत समाजात स्त्रियांचा दर्जा उंचावलेला असतो. म्हणून अशा समाजात स्त्रियामध्ये साक्षरतेचे प्रमाण जास्त तर असतेच शिवाय पुरुषातही साक्षरता जास्त असते. कारण असे म्हणतात की, घरातील एक स्त्री शिकली तर चार पुरुष शिकतात. परंपरागत जुन्या चालीरीती असलेल्या समाजात शिकण्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो. विशेषत: ग्रामीण भागात अशी स्थिती असते ज्या समाजात स्त्रीला पुरुषाइतका समान दर्जा नसतो व समाजात मुक्त प्रवेश नसतो त्या  समाजात साक्षरता कमी असते. उदा. मुस्लिमसमाज. तसेच मागास देशात स्त्री शिक्षणास प्राधान्य नसते. त्यामुळे या देशात साक्षरता प्रमाण कमी असते.

**६) शासकीय धोरण:** शासनाच्या धोरणावरही साक्षरता अवलंबून असते. शासनाची इच्छा शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात विकेंद्रीकरण करावयाचे असल्यास साक्षरता जास्त असते. जगातील अनेक देशांनी शिक्षण मोफत व सक्तीचे केले आहे. अशा देशात साक्षरता जास्त असते.'जेथे प्रौढामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यास प्रौढ साक्षरता अभियान राबविले जाते तेथे प्रौढ साक्षरता जास्त असते.

**७) शिक्षणाचा विकास :** देशात बालवाड्या, शाळा, महाविद्यालये व विद्यापीठांच्या सोईमुळे साक्षरता वाढण्यास मदत होते.

**८) मानवंशशास्त्रीय रचना (Ethnographic Structure) :** साक्षरतेच्या दृष्टीने मानववंशशास्त्रीय घटकही महत्त्वाचा आहे. समाजात भिन्न मानववंशशास्त्रीय संस्कृती असलेला गट असल्यास आणि त्यांच्यात विविध शिक्षण संस्था स्थापण्याची क्षमता असल्यास स्पर्धा वाढून साक्षरता वाढण्यास मदत होते.

**९) धार्मिक पार्श्वभूमी :** काही धर्मात केवळ धार्मिक शिक्षणालाच महत्त्व असते. अशा धर्मातील लोक आपल्या मुलांना शिक्षण देण्यास फारसे उत्सुक नसतात. एकप्रकारे ते शिक्षणाला महत्त्व देत नाहीत. अशा लोकात साक्षरता प्रमाण कमी असते. उदा. मुस्लिम समाजात धार्मिक गोष्टींना प्राधान्य असल्याने त्यांच्यात साक्षरता कमी आढळते.

**१०) राजकीय (ऐतिहासिक) पार्श्वभूमी:** ज्या मागास देशात साक्षरता कमी आहे व जेथे आता साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे अशा देशात साक्षरता कमी असण्यामागे तेथील ऐतिहासिक पार्श्वभूमी असते किंवा तेथील राजकीय स्थिती त्यास कारणीभूत असते. उदा. जगातील परकीय वसाहती असलेल्या देशात तत्कालीन वसाहतदारांनी तेथील साक्षरतेकडे फारसे लक्ष दिले नाही.

**११) भाषा :** मातृभाषेतील शिक्षण मुला-मुलींना सोपे असते. अशा प्रकारच्या शिक्षणाने साक्षरता जलद गतीने समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी असण्याचे एक कारण म्हणजे त्यांची इतर भाषेत शिक्षण घेण्याची तयारी नसते. मुस्लिमात मुलींना इतर भाषेत शिक्षण दिले जात नाही. आता यात बदल होत आहेत. याशिवाय - १) शिकण्याची इच्छा २) शिकण्याची क्षमता व ३) शिक्षणाची संधी या तीन घटकावरही साक्षरतेचे प्रमाण अवलंबून असते.

**भारतातील साक्षरतेचा थोडक्यात आढावा:**

2011 च्या जनगणनेच्या उद्देशाने, सात किंवा त्याहून अधिक वयाची व्यक्ती, जी कोणत्याही भाषेत समजून घेऊन वाचू आणि लिहू शकते, त्याला साक्षर मानले जाते.जो माणूस फक्त वाचू शकतो

पण लिहू शकत नाही तो साक्षर नाही.1991 पूर्वीच्या जनगणनेत, पाच वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना निरक्षर मानले जात असे.

2011 च्या जनगणनेच्या निकालावरून असे दिसून आले आहे की देशात साक्षरतेत वाढ झाली आहे.देशातील साक्षरता दर 74.04 टक्के, पुरुषांसाठी 82.14 आणि महिलांसाठी 65.46 आहे.केरळने 93.91 टक्के साक्षरता दरासह अव्वल स्थान कायम राखले, तर लक्षद्वीप (92.28 टक्के) आणि मिझोराम (91.58 टक्के) या राज्यांनी आपले स्थान कायम ठेवले.

63.82 टक्के साक्षरता दर असलेले बिहार देशात सर्वात शेवटच्या क्रमांकावर आहे, त्याआधी अरुणाचल प्रदेश (66.95 टक्के) आणि राजस्थान (67.06 टक्के) आहे.

**४.४ ग्रामीण व शहरी लोकसंख्या (Rural Urban Population):**

**ग्रामीण लोकसंख्या:**

ग्रामीण लोकसंख्या म्हणजे शहरी भागापेक्षा कमी लोकसंख्येची घनता असलेल्या आणि शहरी केंद्रांपेक्षा मोठ्या क्षेत्रामध्ये पसरलेली लोकसंख्या. ग्रामीण लोकसंख्या म्हणजे शहरांच्या बाहेर राहणारी लोकसंख्या. या भागातील काम शहरी भागापेक्षा शेतीवर अधिक केंद्रित असते.

ग्रामीण भाग सहसा गावांचा संदर्भ घेतात. ग्रामीण भागात सहसा पायाभूत सुविधांच्या बाबतीत फारसा विकास होत नाही. सामान्यतः ग्रामीण भागात अशी फारशी जमीन उपलब्ध नसते जी विकासात्मक कामांसाठी वापरली जात नाही. ग्रामीण भागात विरळ लोकवस्ती आहे.2018 च्या आकडेवारीनुसार भारतातील 65% पेक्षा जास्त लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. स्थलांतरामुळे 2008 ते 2018 पर्यंत भारतातील ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येच्या टक्केवारीत सातत्याने घट झाली आहे. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात लोकसंख्येची घनता कमी आहे. ग्रामीण भागात जमिनीची टंचाई नाही. कमी वाहने, कमी लोकसंख्येची घनता आणि कमी उद्योगधंदे यामुळे शहरी भागाच्या

तुलनेत ग्रामीण भागात फारसे प्रदूषण नाही. भारताच्या ग्रामीण भागात जास्त हिरवळ आहे. ग्रामीण भागात नोकऱ्या कृषी क्रियाकलापांमध्ये केंद्रित आहेत. भारताच्या ग्रामीण भागात, लिंग, धर्म, जात, संस्कृती यामुळे ग्रामीण भागातील सामाजिक स्थितीत नेहमीच खूप फरक असतो. इ.

**शहरी लोकसंख्या:**

शहरी लोकसंख्या म्हणजे लोकसंख्येचे वास्तव्य असलेले क्षेत्र ज्यांची लोकसंख्येची घनता ग्रामीण भागापेक्षा जास्त आहे आणि एकूणच ग्रामीण भागापेक्षा अधिक संक्षिप्त आहे. सोप्या भाषेत, ते शहरांमध्ये राहणारे लोक आहेत.

शहरी भाग सामान्यतः शहरे, उपनगरे आणि शहरांचा संदर्भ घेतात. विमानतळ, बंदरे, रेल्वे, गृहनिर्माण, रस्ते इत्यादी पायाभूत सुविधा आणि कनेक्टिव्हिटीच्या प्रवेशाच्या बाबतीत शहरी भागात अधिक विकास आहे. शहरी भागातील जमिनीचा विकास कामांसाठी वापर केला जातो. शहरी भागात दाट लोकवस्ती आहे.2018 पर्यंत, भारतातील अंदाजे 34% लोकसंख्या शहरी भागात राहते शहरी भागात राहणारी एकूण लोकसंख्या ग्रामीण भागाच्या तुलनेत खूपच कमी असली तरी, शहरी भागात लोकसंख्येची घनता खूप जास्त आहे. शहरी भागात जमिनीची टंचाई आहे.लोकसंख्येची घनता, वाहने आणि उद्योगधंदे यामुळे शहरी भागात खूप जास्त प्रदूषण आहे. भारतातील शहरी भागात फारशी हिरवाई नाही, कारण बहुतांश जमीन इमारती आणि रस्त्यांनी व्यापलेली आहे. शहरी भागात नोकऱ्या सेवा उद्योग, उत्पादन उद्योग, व्यापार आणि वाणिज्य यांमध्ये केंद्रित आहेत. शहरी भागात, सामाजिक अडथळ्यांची समस्या कमी आहे, नोकरी, शिक्षण इत्यादींच्या समान संधी आहेत.